॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
आज़ादी का अमृत महोत्सव

Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572
**ACADEMIC (AFFILIATION) SECTION**
Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

**शैक्षणिकवर्ष २०२६–२७ करीता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव व शुल्क** हे E-Samarth या Online Portal द्वारे सादर करणे बाबत.

## :: परिपत्रक ::

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे, कायम संलग्नीकरणाचे, संशोधन केंद्र ई. चे प्रस्ताव हे E-Samarth या Online Portal द्वारे मागविण्यात येणार आहेत.

संलग्नीकरण शुल्क हे E-Samarth या Online Portal द्वारे स्विकारण्यात येतील.

महाविद्यालयाने प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडावीत व खालील महत्वाच्या बाबींचीही नोंद घ्यावी:

०१. प्रस्तावाच्या दोन प्रती मध्ये सादर कराव्यात.

०२. आपणाकडे सुरु असलेल्या बीए./बी.कॉम/बी.एस्सी. व एम.एम./एम.कॉम/एम.एस्सी. या व इतर अभ्यासक्रम/विषयांच्या मुळ तुकडीस व अतिरिक्त तुकडीस शासनाने दिलेले मंजुरी आदेश, विद्यापीठाने प्रथम मुळ तुकडीस व अतिरिक्त तुकडीस दिलेले संलग्नीकरण पत्र यांच्या छायांकीत प्रती सोबत जोडाव्यात.

०३. E-Samarth या Online Portal द्वारे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता संलग्नीकरण शुल्क भरल्यानंतर दोन दिवसाच्या आत त्याबाबतची मुळ पावती संलग्नीकरण विभागास प्रस्तावासह सादर करावी.

०४. मागील शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ करिता संलग्नीकरण शुल्क भरलेल्या पावतीची छायांकीत व साक्षांकित प्रत.

०५. विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग या सर्व विभागाचे ना–देय ( No Dues) प्रमाणपत्र सादर करावे. तसेच परीक्षा केंद्रासाठी घेण्यात आलेल्या अग्रीम रकमेचे समायोजन केल्याबाबतचे लेखा विभागाचे ना–देय ( No Dues) प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच संलग्नीकरणाचे प्रस्ताव स्विकारले जातील.

०६. या विभागाचे परिपत्रक जावक क्रं. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२५–२०२६/३३९, दि. १०/०७/२०२५ नुसार महाविद्यालयाचे नॅक मुंल्याकनाबाबतची माहिती सादर करावी.

०७. विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत महाविद्यालयांना संलग्नीकरण प्रस्तावासोबत महाविद्यालयात नेमणुक केलेल्या कार्यरत प्राचार्य व प्राध्यापक यांची यादी त्यांचे शैक्षणिक पात्रता, अनुभव नेमणुक दिनांक नमूद करुन तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचीही यादी सादर करावी.

०८. महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखा असल्यास विषयनिहाय प्रयोगशाळेची माहिती व Geotag सह फोटो सादर करावेत.

०९. महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये अभ्यासक्रम/विद्याशाखानिहाय उपलब्ध पुस्तकांची यादी व ते खरेदी केल्याचा पुरावा सादर करावा.

१०. या विभागाचे परिपत्रक जावक क्रं. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/१५२४, दि. ०७/०३/२०२५ नुसार

महाविद्यालयाची वेबसाईट (website) तयार करुन त्याचीही माहिती प्रस्तावासोबत सादर करावी.

११. महाविद्यालयाची इमारत स्व:ताची/भाडयाची असल्यास त्याचे पुरक कागदपत्रे , जमीन अकृषक व जमीन मालकी बाबतचा पुरावा.

तरी सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी उपरोक्त प्रमाणे दि. ०१/०९/२०२५ ते दि. ३०/०९/२०२५ या कालावधीत कायम संलग्नीकरण तसेच नवीन संशोधन केंद्राचे प्रस्ताव सादर करावे विहित मुदतीनंतर सदर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करावेत. विहीत मुदतीत सादर न केल्यास विद्यापीठ नियमानुसार संलग्नीकरणाच्या नुतनीकरणासाठीच्या प्रस्तावास प्रती अभ्यासक्रम, प्रती विद्याशाखा, प्रती तुकडी व प्रती विषय याप्रमाणे प्रति दिन रु. १००/– एवढे विलंब शुल्क भरावे लागेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून मा. व्यवस्थापन परिषद बैठक क्रं. ७४ विषय क्र. ०५/७४–२०२१ दि. ०२/०७/२०२१ व विस्तारीत ०६/०७/२०२१ अन्वये झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने संलग्नीकरण शुल्कात ०७ टक्के वाढ करण्यात आलेली आहे. तसेच सदरील एकुण वाढीव संलग्नीकरण शुल्कावर १८ टक्के जीएसटी (GST) आकारण्यात यावी व त्याप्रमाणे संलग्नीकरण शुल्क जमा करण्यात यावी. सोबत शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ साठी सुधारीत संलग्नीकरण शुल्काचा तक्ता जोडलेला आहे. त्यानुसार सर्व शुल्क भरण्यात यावेत.

महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशांप्रमाणे ई–समर्थ (E-Samarth) संगणकीय कार्य प्रणाली द्वारे वरील सर्व प्रस्ताव स्विकारण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी ई–समर्थ (E-Samarth) संगणकीय कार्य प्रणालीवर महाविद्यालयाची नोंदणी करुन महाविद्यालयाची माहिती अद्यायावत करावी. यासाठी तांत्रीक अडचण असल्यास ९३५९०२६१२२ या भ्रमणध्वनीवर कार्यालयीन वेळत संपर्क साधावा.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिषंकातर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

"ज्ञानतीर्थ", परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड–४३१६०६ )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२५–२०२६/६७६ )(
दिनांक :–२९/०८/२०२५ )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

<u>प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–</u>

१. मा. प्राचार्य, संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.